# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. पी.एस.चव्हाण
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/नावात बदल/८१५३-३३२/२००८, दिनांक : ८ सप्टेंबर, २००८

परिपत्रक

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु
जिल्हा परिषद, ..................(सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, महानगरपालिका,...............(सर्व)

३) मुख्याधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, नगरपरिषद/नगरपालिका.........(सर्व)

विषय :- नावात बदल करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये जन्म नोंदीमधील नावात बदल करण्याबाबतच्या कायद्यातील तरतुदीबाबत वारंवार विचारणा सर्व स्तरावरुन होत आहे. यासाठी मार्गदर्शन होण्यासाठी पुढील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम, २००० मधील १० (१) व जन्म व मृत्यु नोंदणी कायद्यातील कलम १४ अन्वये " जन्माची नोंद नावाशिवाय झालेली असेल तर सदर नोंद झाल्यापासून १५ वर्षापर्यंत नावाचा सदर नोंदीमध्ये समावेश करता येतो. परंतु एकदा नावासहीत जन्माची नोंद झाल्यावर सदर जन्माच्या नोंदीत नावात कोणताही बदल करता येत नाही."

२) सदर नावाच्या नोंदीत काही औपचारिक चूक किंवा लेखनप्रमाद ने राहून गेलेली असेल तर कलम १५ अन्वये चुकीमध्ये दुरुस्ती करता येवू शकते. सदर दुरुस्ती ही फक्त " औपचारिक चूक" या बाबत असून संपूर्ण नावात बदल करण्याबाबत नाही, याची नोंद घेण्यात यावी.

३) सदर नावात बदला बाबतचे परिपत्रक आपल्या जिल्हयातील नगरपालिकाचे मुख्याधिकारी व महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी यांना पोहोचविणे आवश्यक असून त्यांनी येणाऱ्या कायद्याबाबतच्या शंका यासाठी प्रथम जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु, जिल्हा परिषद यांचेशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु,जिल्हा परिषद,.......(सर्व)
२/- आपणा मार्फत संपूर्ण जिल्हयातील निबंधकाना वाटप करण्यात यावे.
प्रत माहितीस्तव सादर :- संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु, मुंबई

F:\83\Circular.doc